साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–भास्कर पांडुरंग पाटील
वय:–६१ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.परसोडी,ता.उमरेड,जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दि.२७/०८/२०२२ रोजी घटना घडलेली आहे. सदर दिवशी मी आमच्या गावातील चौकातुन माझ्या घराकडे येत होते त्यावेळी त्यांनी मला येतांनी पाहिले व त्यांनी म्हणजेच राजेश सोमकुवर यांनी मला पकडले व मला काडीने मारले. त्यावेळी आरोपीच्या मुलांनी मला पकडले व आरोपीने मला डोक्यावर, पाठीवर मारले. त्यानंतर बोधीसत्व शिंदे व अश्वीन उके यांनी भांडण सोडविले त्यानंतर मी माझ्या घरी गेलो. ज्यावेळी मला मारहाण केली त्यावेळी मला काही लागले नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, थोडेसे रक्त लागले होते.

२. सदरचे भांडण ज्या कारणावरून झाले होते ते कारण असे होते की, आरोपी मला म्हणत होता की, तुम्ही माझ्या भावसुनेला मिळकतीत हिस्सा मिळण्यासाठी भडकवता. सदर घटनेच्या दुस–या दिवशी दि.२८/०८/२०२२ रोजी आरोपीने पुन्हा मला मारहाण केली. त्यावेळी आरोपीने माझ्या पाठीवर, कपाळावर, डोक्यावर मारले त्यामुळे माझ्या डोक्यातुन रक्त निघायला लागले. त्यानंतर शुध्दोधन मेश्राम हा तेथे आला व त्याने भांडण सोडविले. त्यानंतर विशाल पाटील हा गाडी घेउन आला व गाडीवर मला मांडले व पो.स्टे.ला घेउन आले. त्यानंतर मी रिपोर्ट दिली. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र. ११** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र. १२** देण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी मला वैद्यकिय तपासणीकामी दवाखाण्यात नेले. त्यानंतर डॉक्टरांनी मला तपासले. आरोपीने मला ज्या काठीने मारले ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जी.पी.न.१७/२०२३ वरिल एक लाकडी काठी दाखविण्यात आली ती तीच आहे त्यास **एम.ओ.०१** देण्यात आला. आता मला जी.पी.न.१७/२०२३ वरिल एक पांढ–या रंगाचा सहा पांढ–या बटन असलेला

ज्यावर लालसर रंगाचे रक्ताचे डाग असलेला फुल बायाचा शर्ट दाखविण्यात आला तो तोच आहे त्यास **एम.ओ.०२** देण्यात आला. त्यानंतर मला जी.पी.न.१७/२०२३ वरिल एक पांढ–या रंगाची रिंगो कंपनीची बनियान त्यावर लालसर रंगाचे रक्ताचे असलेली फुल बाह्याची बनियान दाखविण्यात आली ती तीच आहे त्यास **एम.ओ.०३** देण्यात आला. त्यानंतर मला जी.पी.न.१७/२०२३ वरिल एक पांढ–या जांभळ्या रंगाचा त्यावर निळ्या पांढ–या रंगाच्या चौकटी असलेला चौकडा शर्ट दाखविण्यात आला तो आरोपीने घातला होता किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. त्यानंतर मला जी.पी.न.१७/२०२३ वरिल एका प्लास्टीकच्या सिलबंद डब्यात माझे रक्ताचे डाग असलेले कापसाचे बोळे दाखविण्यात आले ते तेच आहे त्यास **एम.ओ.०४** देण्यात आला. मला ज्या माणसाने मारले आहे त्या माणसाला पाहिल्यास मी ओळखू शकतो. सदर माणूस न्यायालयात हजर आहे तो तोच आहे.

<u>सरतपास संपला.</u>

<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री.एम.आर.धांडे यांच्यामार्फत सुरू.</u>

३. पोलिसांनी माझे बयाण व फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे नोंदवुन घेतली होती व मी वाचुन पाहिल्यानंतर मी त्यावर सहि केली होती. मी पोलिसांना फिर्याद व बयाण देते वेळेस असे सांगितले होते की, मी परसोडी गावाच्या चौकातुन घरी येत होतो. आता मला फिर्याद व बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकूर जसाच्या तसा नमुद नाही तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझे सदर घटनेच्या पुर्वीपासुनच पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्यावर जी केस टाकलेली आहे ती याच न्यायालयात प्रलंबित आहे व तिची तारिख काल होती. मी दि.२७/०५/२०२५ रोजी न्यायालयात हजर होतो. तसेच मी कालसुध्दा न्यायालयात हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७/०८/२०२२ रोजीच्या घटनेची तक्रार मी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७/०८/२०२२ रोजी कोणतीही घटना घडली नाही त्यामुळे मी रिपोर्ट दिलेला नाही.

४. आरोपीच्या भावसुनेचे नाव काय आहे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे

आहे की, आरोपी व आरोपीच्या भावसुनेमध्ये काय भांडण सुरू आहे याबाबत मला काही माहिती नाही. आरोपीकडे वडीलोपार्जित शेतजमिन असल्याबाबत मला माहित आहे.

**उर्वरित उलटतपास हा पुरेशी तयारी नसल्यामुळे तहकूब करण्याकामी आरोपीच्या वकीलांमार्फत श्री. एम. आर. धांडे यांचा लेखी अर्ज दाखल. सबब उलटतपास साक्ष भत्यावर तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१०.०६.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड